सत्यमेव जयते

अन्नं बहु कुर्वीत तद् व्रतम्

**महाराष्ट्र शासन**
**महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी**
**कार्यालय - कुलसचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी**

दुरध्वनी क्र. ०२४२६-२४३२१६
ई-मेल registrar.mpkv@nic.in

पत्ता : - मध्यवर्ती परिसर, प्रशासकीय इमारत,
महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, ता. राहुरी,
जिल्हा - अहिल्यानगर. पिन - ४१३ ७२२.

---

जा.क्र.प्रशासन/शाखा-ब/प्र.ग्र/गट-क/ड/पात्र-अपात्र/यादी/हमीपत्र/२३५२/२०२५ दिनांक : ११/०७/२०२५

**वाचा :-** १. शासन निर्णय क्रमांक:कृषिवि-३७२३/प्र.क्र.१६९/६-अे दिनांक: १४ ऑक्टोबर, २०२४
२. जा.क्र.प्रशासन/शाखा-ब/प्रकल्पग्रस्त/जाहिरात/गट(क)(ड)/४४१५/२०२४, दिनांक: ३१.१२.२०२४

# निवेदन

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, ता. राहुरी, जि. अहिल्यानगर, कार्यक्षेत्रातील (अहिल्यानगर, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, नाशिक, धुळे, नंदुरबार व जळगांव) ज्या प्रकल्पग्रस्तांनी प्रत्यक्षात महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी या प्रकल्पाकरिता जमिनी दिलेल्या आहेत, अशा प्रकल्पग्रस्त कुटुंबातील उमेदवारांना सरळसेवेने रिक्त पदांवर भरती करण्यासाठी संदर्भ क्रमांक १ वरील शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार संदर्भ क्रमांक २ नुसार दिनांक ३१.१२.२०२४ रोजी विद्यापीठ प्रकल्पग्रस्त पदभरती जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदरच्या जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या गट - क व गट - ड मधील पदांसाठी प्राप्त अर्जांच्या छाननीअंती पात्र / अपात्र उमेदवारांची यादी विद्यापीठ संकेतस्थळ (mpkv.ac.in) वर प्रसिध्द करण्यात येत आहे.

तसेच, विद्यापीठ प्रकल्पग्रस्त जाहिरातीच्या अनुषंगाने पात्र उमेदवारांनी एका पेक्षा जास्त पदांकरिता (गट - क व गट - ड या दोन्ही संवर्गातील पदांकरिता) अर्ज सादर केलेले आहेत, अशा पात्र उमेदवारांनी संबंधित पदांकरिता नियुक्तीचा प्राधान्यक्रम हमीपत्र देणे अनिवार्य आहे. सदर सोबत जोडलेले हमीपत्र **दिनांक: २५/०७/२०२५** पर्यत कुलसचिव, म.फु.कृ.वि., राहुरी यांच्या कार्यालयास कार्यालयीन वेळेत सादर करावे.

R.S.patil

**(राजेंद्रकुमार पाटील)**
**कुलसचिव**

**महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी**

**प्रकल्पग्रस्त जाहिरातीमधील पदाकरीता नियुक्तीचा प्राधान्यक्रमाबाबतचे**

# हमीपत्र

मी, श्री /श्रीमती ------------------------------------------

रा. ------------------------------

ता.------------------------------

जि. ------------------------------

असे लिहुन देतो की, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी प्रकल्पग्रस्ताकरीता दिनांक ३१.१२.२०२४ रोजी प्रसिध्द केलेल्या जाहिरातीच्या अनुषंगाने एकापेक्षा जास्त पदांकरीता (गट-क व गट-ड या दोन्ही संवर्गातील पदांकरीता) अर्ज सादर केलेले आहेत. मी, ज्या पदांकरीता अर्ज सादर केला आहे, त्या पदांकरीताचा नियुक्तीचा प्राधान्यक्रम खालीलप्रमाणे देत आहे.

१. --------------------------------------------

२. --------------------------------------------

३. --------------------------------------------

४. --------------------------------------------

५. --------------------------------------------

६. --------------------------------------------

७. --------------------------------------------

८. --------------------------------------------

९. --------------------------------------------

१०. --------------------------------------------

उक्त प्राधान्यक्रम मी स्वतःच्या जबाबदारीने लिहून देत आहे. भविष्यात निवड झालेस वरील प्राधान्यक्रमानुसार मला नियुक्ती मिळणेस पात्र असेन याची मला कल्पना आहे. वरील प्राधान्यक्रमाने पदावरील नियुक्तीबाबत भविष्यात माझी कोणतीही लेखी अथवा तोंडी तक्रार असणार नाही असे हमीपत्र लिहुन देत आहे.

**ठिकाण :**

**दिनांक :**

स्वाक्षरी

(संपूर्ण नांव :---------------------------------

मोबाईल क्र. --------------------------------